MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १७ अंक : २ पाने : ८ फेब्रुवारी-मार्च २०२२ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

नवीन वित्तीय वर्षात आपण पर्दापण केलेले आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नांमुळे गेल्या वित्तीय वर्षात चांगली कामगिरी करण्यात आपल्याला यश मिळाले आहे. आता २०२२-२०२३ या वर्षात सुध्दा आपण सर्वजण मिळून भरीव कामगिरी करून प्रगतीचा एक नवा टप्पा गाठू, असा मला दृढविश्वास आहे.

विद्युत क्षेत्रात तिमाही (एप्रिल, मे, जून) अतिशय महत्त्वाचे आहे. या तिमाहीमध्ये सर्वात जास्त विजेची मागणी असते. त्याकरिता पारेषण प्रणाली सक्षमपणे हाताळणे गरजेची असते. मला

- **पारेषण प्रणाली सक्षमपणे हाताळणे गरजेची**
- **यंत्रणेची सुव्यवस्था व देखभाल महत्त्वाची**
- **सततच्या पाठपुराव्यामुळे कामास गती**
- **गुणात्मक विकासासाठी प्रशिक्षण आवश्यक**

अभिमान आहे की, वीजवहनाचा विक्रम आपण नोंदवत चाललेलो आहोत. परंतु, हे करीत असताना आपली यंत्रणेची सुस्थिती व देखभाल करण्यामध्ये कोणतीही उणीव आपण सोडता कामा नये. पारेषण प्रणालीची सुव्यवस्था व देखभाल संपूर्ण व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग ठरतो.

मॉन्सूनपूर्व कामे आपण वेळेवर व नियोजनबध्दरित्या पूर्ण केली पाहिजेत. आपल्या सर्व कार्यक्षेत्रात नियोजन आणि अंमलबजावणी यांचे योग्य व्यवस्थापन असले पाहिजे. सर्व कामात नियोजनबध्दता व कार्यवाही योग्य प्रकारे केल्यास त्याच्या एकत्रित परिणामांमुळे कंपनीच्या संपूर्ण कामगिरीत सकारात्मकता दिसून येईल.

नियोजन आणि कार्यवाही यानंतर इतर विषयातही आव्हाने आहेत. यंत्रणा अधिक स्वयंचलित (Automation) करणे, नवीन कल्पना विकसित करणे, अंदाज बांधणे व उभारणी करणे, सर्व साधने मिळविणे, संपर्क व्यवस्थापन प्रभावी करणे, नियमने आणि वाणिज्यिक क्षेत्र, कायद्याचे पालन, वित्त व लेखा तसेच मानव संसाधन व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात आव्हाने आहेत. विजेच्या तिन्हीही क्षेत्रात आव्हाने आहेतच, या आव्हानांचे स्वरूप, त्यांची भूमिका ही गरज आणि महत्त्व यांच्यानुसार बदलू शकते.

आपल्या तिन्हीही कंपन्यांमध्ये (महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण) कामांत सतत आव्हाने निर्माण होत आहेत. त्यासाठी विशेष ज्ञान व कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. वीज अभियंत्याच्या कौशल्यामध्ये विकासाला वाव आहे. परंतु, त्यांच्यात वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान व कौशल्याचा अभाव जाणवतो. आपणास वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानाच्या माहितीसाठी सल्लागार संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्यावर अवलंबून राहावे लागते, ते आपल्याला टाळता आले पाहिजे.

आपण फक्त सध्याच्या काळासाठी काम करतो, त्याऐवजी भविष्याचा विचार करून आपण काम केले पाहिजे. पायाभूत क्षेत्रामध्ये कार्यरत आहोत, म्हणून आपण भविष्यासाठी काम करण्याची दृष्टी बाळगली पाहिजे. किंबहूना, तशी सवय लावून घेतली पाहिजे. आपला दृष्टिकोन आणि संवेदनशीलता यात परिपूर्णता आणून त्याचा वापर आपल्या कामात दिसला पाहिजे.

काळाची गरज ओळखता आज आपल्याला समाधानी होऊन चालणार नाही. अनेक क्षेत्रामध्ये सुधारणा करून व्यवस्थेला तत्पर व भक्कम बनविण्यात सर्वांनी हातभार लावणे गरजेचे आहे.

प्रकल्पांच्या कामामध्ये बऱ्याच अडचणी असतात. सर्व प्रकल्प त्या वेळेत, खर्चात व गुणवत्तेच्या कसोटीमध्ये खरे उतरून पूर्ण होणे कंपनीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. सततचा पाठपुरावा, आढावा व नियंत्रणाने प्रकल्पाच्या कामास गती येते. प्रकल्पामध्ये अनेक वेळा कल्पकता व सचोटी कामास येते. अनेक जटील विषय कल्पकतेच्या जोरावर आपण नवीन आयाम देऊ शकतो. त्यातून आपले विषय मार्गी लावू शकतो.

सर्व जिल्ह्यांत महापारेषण यंत्रणेचे सातत्याने



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात येत आहे. तसेच या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे नवे तंत्रज्ञान वापरून करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य किती मोठे आहे, याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. राज्याच्या वीजपुरवठ्यावर लक्ष ठेवणे आणि तो सुरळीत राहील, यासाठी पराकाष्ठा केली जात आहे; पण त्यात नवे तंत्रज्ञान वापरून सुधारणा करणे गरजेचे होते. ती प्रक्रिया आता वेगवान झाली पाहिजे.

कंपनी यंदाही प्रशिक्षणाच्या मुबलक संधी उपलब्ध करून देणार आहे. मला आशा आहे की, आपण सर्व गुणात्मक विकास करण्यासाठी प्रशिक्षणाचा चांगला उपयोग करावा. प्रशिक्षणामुळे आपल्याला नवीन दिशा मिळते. तसेच ज्ञानात भर पडते. त्यामुळे आपण अधिक कार्यकुशल होऊन आपले मनोबल उंचावतो. मला आशा आहे की, आपण सर्व २०२२-२०२३ या वर्षात कंपनीला यशाच्या पुढच्या पायरीवर घेऊन जाण्याकरिता मला सहकार्य कराल.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**ऐरोली :** संकुलातील महापारेषणच्या नियोजित प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी म.रा.वि. सूत्रधारी कंपनीचे मुख्य सल्लागार श्री. उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ.

### सर्व विभागीय कार्यालये एकाच छताखाली येणार

# महापारेषणची नवीन प्रशासकीय इमारत पर्यावरणाचा समतोल राखणारी असावी : ऊर्जामंत्री

Follow us on :

``विद्युतक्षेत्र महत्त्वाचे असून विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचे योग्य वितरण करण्यासाठी पारेषण यंत्रणाही सक्षम आहे. महापारेषणच्या नियोजित इमारतीमध्ये वाशी परिमंडळातील सर्व विभागीय कार्यालये एकाच छताखाली येणार असल्यामुळे महापारेषणचे व्यवस्थापन व समन्वय चांगला होईल. त्याचबरोबर पर्यावरण समतोल राखण्यासाठी या इमारतीच्या छतावर रेन वॉटर हार्वेस्टिंग व सौरऊर्जेची यंत्रणा उभारावी,`` असे प्रतिपादन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केले.

ऐरोली संकुलातील महापारेषणच्या नियोजित प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन ऊर्जामंत्री श्री. नितीन राऊत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ऊर्जामंत्री डॉ. राऊत बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कंपनीचे मुख्य सल्लागार श्री. उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. मोहन ननवरे उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप म्हणाले, ``राज्य भार प्रेषण केंद्र वाशी परिमंडळातील २२ विभागीय कार्यालये एकाच ठिकाणी होणार आहेत. सर्व विभागीय कार्यालये सर्वसुविधायुक्त व पर्यावरणपूरक होणार आहेत. रूफटॉप, रेन वॉटर हार्वेस्टिंग व नैसर्गिक प्रकाश मिळण्यासाठीची व्यवस्था यामध्ये असणार आहे.``



**ऐरोली :** भूमिपूजन समारंभाला उपस्थित असलेले अधिकारी व कर्मचारी वर्ग.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले, ``तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभाजनानंतर वाशी परिमंडळाचे कार्यालय अपुऱ्या जागेत कार्यान्वित झाले होते. इतर कार्यालयेही ऐरोली संकुलात आहेत. महापारेषणची उद्दिष्टये गाठण्यासाठी एकाच छताखाली सर्व कार्यालये होणार आहेत, ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे प्रशासकीय व्यवस्थापनाचा खर्च कमी होईल. तसेच अधिकारी व कर्मचारी यांची कार्यक्षमता वाढेल. संरक्षक भिंत व सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करावी. अग्निसुरक्षा व अग्निशमन यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नवीन सुसज्ज वसाहत, क्लब हाऊस, फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटनसाठी क्रीडांगण, योगा कक्ष, वाचनकक्ष, आधुनिक ग्रंथालय, आरोग्याच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्र, जैवविविधतेच्या दृष्टीने उद्याने, शेततळे, जॉगिंग ट्रॅक करावेत.``

याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रातिनिधीक अडचणी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी ऐकून घेतल्या. तसेच त्या तात्काळ सोडविण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. प्रारंभी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा सत्कार महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप यांनी केला. महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कंपनीचे सल्लागार श्री. उत्तमराव झाल्टे यांचा सत्कार संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती विभावरी बाविस्कर यांनी केले. मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ यांनी आभार मानले.

Budget

▶ ऊर्जामंत्र्यांनी केले अर्थसंकल्पाचे स्वागत

# राज्याला नवीन ऊर्जा देणारा अर्थसंकल्प : डॉ. नितीन राऊत

Follow us on :

"राज्य विधिमंडळात सादर झालेला अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला नवीन ऊर्जा देणारा आहे", अशा शब्दात राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. उद्योग, व्यापार व शेतीला चालना मिळून यातून रोजगार निर्मिती होणार आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. नितीन राऊत यांनी दिलेली आहे. राज्यातील दलित, मागासवर्गीय, महिला व दुर्बल घटकांना विकासाची खात्री व न्यायाची हमी देणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

१ एप्रिल २०१८ पासून प्रलंबित असलेल्या २ लाख ४० हजार कृषिपंपापैकी महाविकास आघाडी सरकारच्या काळात आजपर्यंत १ लाख कृषिपंपाना नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. २०२२-२३ या कालावधीत आणखी ६० हजार कृषिपंपांचे वीज जोडणीचे उद्दिष्ट साध्य करण्याचा संकल्पही आम्ही या अर्थसंकल्पात व्यक्त केला आहे, असेही डॉ. राऊत यांनी म्हटले आहे.

राज्यात एकूण ५७७ मेगावॅटचे नवीन सौरऊर्जा प्रकल्प कौडगाव (जि.लातूर), साक्री (जि.धुळे), वाशीम, कचराळा (जि. चंद्रपूर) व यवतमाळ येथे उभारण्यात येणार आहेत. राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर पार्क विकसित करण्याची तरतूद या अर्थसंकल्पात केली असल्याची माहिती डॉ. राऊत यांनी दिली. अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तींच्या घरासाठी स्वस्तात वीज जोडणी देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश



योजनेचा कालावधी ६ डिसेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन आर्थिक वर्षासाठी ऊर्जा विभागाला ९ हजार ९२६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित असून यामुळे ऊर्जा विभागाला फायदा होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मुंबईत पारेषण प्रणालीच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी ५ प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी ११५३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ऊर्जा विभागाला राज्याला थकबाकीमुक्त करण्यासाठी आणि ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी अधिक आर्थिक मदतीची अपेक्षा आहे. विविध मार्गांनी ही अपेक्षा येत्या आर्थिक वर्षात पूर्ण होईल, असा विश्वास वाटत असल्याचेही ऊर्जामंत्री डॉ. राऊत यांनी म्हटले आहे. नागपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था स्थापन करण्याची तरतूद केल्याने विदर्भात पदव्युत्तर शिक्षणाची संधी मिळणार असल्याने या अर्थसंकल्पाचे मनापासून स्वागत करत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

---

# महावितरणच्या महिला संचालकपदी (स्वतंत्र) ज्योती चिमटे यांची नियुक्ती

Follow us on :

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या महिला संचालकपदी (स्वतंत्र) महापारेषणच्या पुणे परिमंडळातील अधीक्षक अभियंता (संवसु) श्रीमती ज्योती नितीन चिमटे यांची नियुक्ती झाली आहे.

श्रीमती ज्योती चिमटे या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) येथील विद्युत संचरण व दूरसंचार अभियांत्रिकी (BE-E&TC) पदवीधर आहेत. १९९८ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) मध्ये त्या कनिष्ठ अभियंता या पदावर रूजू झाल्या होत्या. तद्नंतर, महापारेषण कंपनीत त्यांनी सरळसेवा व बढतीव्दारे विविध पदांवर काम पाहिले. २०१७ पासून त्या अधीक्षक अभियंता या पदावर कार्यरत आहेत.

श्रीमती चिमटे यांना महापारेषणच्या संचलन व सुव्यवस्था (Operations & Maintenance) चाचणी विभाग (Testing)/दूरसंचारण विभाग (PLCC), उदादिधा (HVDC-Lines) व पारेषण प्रकल्प योजना (Trans Project Scheme) अशा विविध क्षेत्रीय कार्यालयीन स्तरावरील व सांघिक कार्यालयातील कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे.

त्यांच्या या नियुक्तीबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. आर. एन. मस्के, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत विके यांनी अभिनंदन केले आहे.



आम्ही आता लाइव्ह आहोत!
MahaTranscoOfficial
@Mahatranscoltd
@maha_transco




**शिर्डी :** विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या २० व्या द्वैवार्षिक महाअधिवेशनात उद्घाटक म्हणून बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. समोर उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

▶ विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या अधिवेशनात ऊर्जामंत्र्यांची ग्वाही

# ऊर्जा विभागातील कामगारांना वाऱ्यावर सोडणार नाही : डॉ. नितीन राऊत

Follow us on :

``खासगीकरणाला माझा व महाविकास आघाडीचा विरोध असून यासंदर्भात मी संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून भूमिका स्पष्ट केली आहे. ऊर्जा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या हिताला बाधा येणार नाही, याची पालक या नात्याने पूर्ण काळजी घेणार असून ऊर्जा विभागातील कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही``, अशी ग्वाही राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली.

विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या शिर्डी येथे आयोजिलेल्या २० व्या व्दैवार्षिक महाअधिवेशनाला उदघाटक म्हणून ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी संबोधित केले. याप्रसंगी त्यांच्या हस्ते संघटनेच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्राच्या खासगीकरणासाठी गेल्या दोन-तीन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. वीज कायद्यात दुरुस्ती करून खासगीकरणाचा दबाव वाढविला आहे. मात्र, महाराष्ट्र सरकार या दबावाखाली बळी पडणार नाही आणि ऊर्जा क्षेत्राचे खासगीकरण होणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. केंद्राच्या खासगीकरणाच्या धोरणाला मी वेळोवेळी पत्र लिहून आणि बैठकांमध्ये विरोध केला आहे, असे स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केले.

"वीज कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक निर्णय घेणार असून, मी सुद्धा गरीब व कष्टकरी कुटुंबातील आहे. त्यामुळे कुणावरही अन्याय होऊ देणार नाही," अशी हमी ऊर्जामंत्री यांनी दिली.

यावेळी व्यासपीठावर महाविम सूत्रधारी कंपनीचे सल्लागार श्री. उत्तम झाल्टे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे केंद्रीय अध्यक्ष श्री. रवी बारई, सरचिटणीस श्री. आर. टी.देवकांत, महावितरणच्या मानव संसाधन विभागाचे संचालक डॉ. नरेश गिते, महानिर्मितीचे संचालक श्री. मानवेंद्र रामटेके, महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, महावितरणचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड, मुख्य औद्योगिक संबध अधिकारी श्री. भरत पाटील, अधिक्षक अभियंता श्री. सुनिल काकडे व श्री. श्रीकृष्ण नवलाखे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## कामगारांबद्दल गौरवोद्गार

कोरोना, चक्रीवादळ, पूरपरिस्थिती वा कुठल्याही आपत्कालीन स्थितीत जीवावर उदार होऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कार्य कामगारांनी केल्याचे त्यांनी सांगितले. दुर्गम भाग तसेच रायगड किल्ल्यावर सुध्दा वीजयंत्रणा उभी केल्याबद्दल त्यांनी कामगारांचे कौतुक केले. मुंबईत ऑक्टोबर २०२० मध्ये वीजपुरवठा बंद झाला तेव्हा ४५० प्रति किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याची पर्वा न करता आपल्या कामगारांनी काही तासात वीजपुरवठा सुरळीत केला, याबद्दल माझा तुम्हा सर्वांना सलाम आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तांत्रिक कामगार हे ऊर्जा विभागाचे कान आणि डोळे आहेत असेही ते म्हणाले.

## ऊर्जामंत्र्यांचे डोळे पाणावले

***यावेळी बोलताना गरिबीचे चटके काय असतात याची मला कल्पना आहे, असे सांगताना त्यांनी बालपणीच्या खडतर आठवणी सांगितल्या. "गिरणी कामगार असलेल्या वडिलांच्या पायाला पकडून जेव्हा मी सायकल घेऊन मागितली तेव्हा ते मला ३०० मीटर तसेच फरफटत पुढे घेऊन गेले. बेटा, माझ्याकडे तुला सायकल घेऊन देण्यासाठी पैसे नाहीत," हे सांगताना डॉ. राऊत यांच्या डोळ्यात पाणी तरळले.***

आम्ही आता लाइव्ह आहोत!

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

कोकण रेल्वेला सुरळीत व योग्य दाबाने वीजपुरवठा होणार

# १०० के. व्ही. माणगाव TSS उपकेंद्र तात्काळ कार्यान्वित

Follow us on :

कोकण रेल्वेला जलद गतीने विद्युत पुरवठा करण्यासाठी आणि कोकण रेल्वेचे डिझेल इंजिन काढून विद्युत इंजिनने कोकण रेल्वे सुरळीत व अखंडितपणे योग्य दाबाने कार्यान्वित राहण्यासाठी १०० के. व्ही. माणगाव TSS कार्यान्वित करण्यात आले.

माणगाव TSS (Kokan Railway Part) या उपकेंद्राला कार्यान्वित करण्यात आले. या उपकेंद्राचे उद्घाटन वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. रवींद्र नगरे, अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. मोरेश्वर ढोरे, अधीक्षक अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. जधवार, श्री. भूषण बल्लाळ, श्री. नितीन दुबेवार, श्री. गिरीष मालोदे, श्री. मोहन ननावरे, श्री. युवराज बागडे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**माणगाव :** १०० के. व्ही. माणगाव TSS वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी सर्वश्री रवींद्र नगरे, मोरेश्वर ढोरे, पीयूष शर्मा, भूषण बल्लाळ, नितीन दुबेवार, गिरीष मालोदे, मोहन ननावरे, युवराज बागडे.

# राष्ट्रीय पॅरा स्विमिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत नागार्जुनराव अकुला यांचे यश

Follow us on :

उदयपूरमध्ये झालेल्या २१ व्या राष्ट्रीय पॅरा स्विमिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत नागार्जुनराव अकुला यांनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत देशातील २३ राज्यातून सुमारे ५०० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये औरंगाबाद येथून प्रतिनिधीत्व करण्यासाठी वित्त व लेखा मंडळाचे व्यवस्थापक श्री. नागार्जुनराव अकुला व औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकूनपदी कार्यरत असणारे श्री. देविदास झिटे या दोन स्पर्धकांची निवड झाली होती. श्री. नागार्जुनराव अकुला यांनी ८७ टक्के शारीरिक अपंगत्वानुसार S6 या श्रेणीनुसार तर श्री. देविदास झिटे यांनी ६१ टक्के शारीरिक अपंगत्वानुसार S8 या श्रेणीनुसार स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.

शंभर मीटरच्या दोन्ही स्पर्धेत श्री. नागार्जुनराव अकुला यांनी एक रौप्यपदक व कांस्यपदक मिळविले. तर श्री. देविदास झिटे यांनी ५० ब्रेस्ट स्ट्रोक शैलीमध्ये एक कांस्यपदक मिळवून यश संपादन केले.

या यशाबद्दल औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्र.) श्री. मिलिंद बनसोडे, अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण यांनी अभिनंदन केले.



आमच्याशी कनेक्टेड रहा

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

## रयतेचा राजा



**मुंबई :** येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन करून अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर. शेजारी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ.

### अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरूवातीला संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकीचे बळ




### नियोजित वेळेअगोदरच काम केले पूर्ण

# २२० के. व्ही. बोईसर-२ उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांची उल्लेखनीय कामगिरी

Follow us on :

बोईसर विभागीय कार्यालया अंतर्गत २२० के. व्ही. उपकेंद्र, बोईसर-२ हे कार्यरत आहे. २२० के. व्ही. बोईसर-२ उपकेंद्रात २२० के. व्ही. बसचे आऊटेज घेऊन २२० के. व्ही. PGCIL Line No.03 च्या Bay चे Strengntring चे काम महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी सलग दोन रात्र जागून पूर्ण करून घेतले.

२२० के. व्ही. PGCIL Line No.03 चा R ph Wavetrep पडून On CT Damage झाली होती. रात्रभर CT बदलून सकाळी लोड वाढण्यापूर्वी Line Service ला घेतली. त्याआधी फेल झालेला 200 MVA ICT कमी वेळेत चार्ज केला.

उपकेंद्रावरील दोन्ही कामाच्या वेळेस वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके व कळवा मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री.



पीयूष शर्मा यांनी प्रत्यक्ष उपकेंद्रात हजर राहून Bay चे Strengntring च्या कामासाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोईसर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. राजेश दखणे, बोईसर-२ उपकेंद्राचे प्रमुख श्री. सोनू घुटके व त्यांच्या सहकाऱ्यांनी नियोजित वेळेच्या आधी पूर्ण करण्यासाठी २२० के. व्ही. उपकेंद्र, बोईसर-२ येथील कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

# छायाचित्रांतून...



**धरणगाव (मलकापूर) :** २२० के. व्ही. धरणगाव येथील उपकेंद्राचा राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते आभासी पध्दतीने लोकार्पण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अन्न व औषध प्रशासनमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे होते. याप्रसंगी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत, अधीक्षक अभियंता श्री. सुनील शेरेकर, श्री. गोविंद जाधव, श्री. प्रमोद पखाले, श्री. सुधीर ढवळे.



**औरंगाबाद :** अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता (प्र.) श्री. मिलिंद बनसोडे व अन्य अधिकारी. श्री. प्रमोद पखाले, श्री. सुधीर ढवळे.




**औरंगाबाद :** जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्याविषयक जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता (प्र.) श्री. मिलिंद बनसोडे, डॉ. विरेंची वैद्य, डॉ. वर्षा वैद्य, डॉ. प्रवरा जोशी, सौ. मंजूषा दुसाने, श्रीमती सीमा गाडेकर, श्रीमती स्वप्ना पाटील.



**नागपूर :** अऊदा स्थापत्य बांधकाम नि. सु. प्रविभाग, नागपूर येथे महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अधिकारी व महिला वर्ग.



**अमरावती :** अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, अमरावती येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अधिकारी व महिला वर्ग.

**From the Desk of Director, HR**

# सोहं



जो व्यक्ती स्वतःवर प्रेम करतो तो अर्थात दुसऱ्यांवरही प्रेम करायला शिकतो. प्रेम ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे. तर स्वार्थ ही जगातील सर्वात मोठी कमजोरी आहे. आपल्यामधील जागृत शक्ती वाढवायची असेल तर स्वतःवर प्रेम करा. स्वतःचे स्वतःच चाहते व्हा. मग, पहा आयुष्य किती सुंदर होत जाते. आयुष्याचा आनंदमहोत्सव करायला हवा. आपण ज्या रचनेममध्ये, आकारामध्ये, स्थितीमध्ये आहोत. त्याचा आनंदाने स्वीकार करून स्वतःविषयी अभिमान बाळगायला शिका.

उत्पत्ती, स्थिती आणि लय या तिन्हीही अवस्थेत स्वतःबद्दल आदर, प्रेम आणि निष्ठा जोपासली पाहिजे. मग, साहजिकच आपण स्वतःची चांगली काळजी घ्यायला लागतो. आपला आत्मविश्वास अधिक बळावतो. आपल्या मनावर संतुलन राखता येते. एकूणच, स्वतःवर आपण जाणीवपूर्वक मेहनत घेतो. स्वत्व विसरून जात नाही. आपल्या अंतरंगात आनंद वास्तव्य करीत असतो. ‘जे जगी, ते देही’ आपल्या देहामध्ये संपूर्ण ब्रह्माडाची किमया आहे. त्या देहातील असलेल्या मनात संपूर्ण शांतता, निरागसता, शांती, समृध्दी, सुख आणि शक्ती दडलेली असते. त्यासाठी या देहाची व मनाची खूप चांगली मशागत करायला हवी. अनेकातून एकात आणि एकातून अगदी सुक्ष्म स्तरावर जाता आले पाहिजे.

आपण नेहमी बाह्य वातावरणात रमतो. पण, यशस्वी माणूस कायम अंतरंगात डोकावून पाहत असतो. अंतरंगात एकरूप झाल्याने आपली अवलोकन शक्ती वाढते. आपण अगदी सहज होऊन जातो. आपल्या राग-लोभांवर ताबा मिळविता येतो. खऱ्या अर्थाने आपण एक आनंदमय जीवन जगू शकतो.

सोहंचा दुसरा अर्थ म्हणजे स्वतःपासून बदल. दुसऱ्यावर अवलंबून न राहता, दुसऱ्याला उपदेश न करता किंवा कुणाकडूनही कोणतीही अपेक्षा न ठेवता स्वतःमध्ये बदल घडवून आणणे. स्वतः बदलणे. बोलणे कमी व कृती जास्त ठेवणे, असे आपले आचरण असले पाहिजे. कर्तुत्वाचा पुजारी होणे, चांगले-वाईट, पाप-पुण्य यांची जबाबदारी स्वतःवर घेणे. स्वतःपासून सुरूवात करणे. निरपेक्षता, साधेपणा, निरागसता, शिस्त, चिकाटी, उमेद, जिद्द कटिबध्दता, निर्मळपणा, नम्रता हे सद्गुण सोहंच्या अंगीकारण्याने प्राप्त होते.

दुसऱ्यामध्ये जो बदल आपल्याला अपेक्षित असतो तो आपण स्वतः स्वीकार करून अंगीकृत करायला पाहिजे. इथे दोन पायऱ्या आहेत. पहिली पायरी म्हणजे स्वीकार व दुसरी म्हणजे अंगीकारणे. बदल स्वीकारून नंतर अंगी बाणवता आला पाहिजे.

सुक्ष्मात किती शक्ती आहे, ते आपल्याला अणुबॉम्बमुळे माहिती झाली आहे. किंबहुना त्यापेक्षा कितीतरी अधिक शक्ती मानवी शरीरात व मनात आहे. ती फक्त आपल्याला जागृत करता आली पाहिजे. तसे आपण केले तर सिध्दता प्राप्त होते.

स्वतःवर प्रेम करणे ही तुमच्या यशाची गुरुकिल्ली आहे. सेल्फ लव्ह, सेल्फ मोटिव्हेशन आपल्याला या धावत्या युगात तग धरून रहायला शिकविते. ही आपली आंतरिक शक्ती असते. ती आपल्याला कधीच निराश करीत नाही.

‘सेल्फ लव्ह’ हा आपल्या यशाच्या चढत्या आलेखाचा मंत्र ठरतो. तुमच्या कामात यश मिळविण्यासाठी स्व-प्रेम हा बुस्टर डोस ठरतो. स्वतःवरच्या प्रेमामुळे तुम्ही स्वतःला समजून घेऊ शकाल. यामुळे तुम्ही समोरच्या व्यक्तीलाही उत्तमरित्या कनेक्ट व्हाल. आपल्या आजूबाजूंच्या लोकांना समजून घेणे, हे महत्त्वाचे आहे.

दुसऱ्यांसारखे जगणे किंवा स्वतःचे आयुष्य दुसऱ्यांच्या तत्त्वाने जगणे म्हणजे स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान आहे. सगळे युनिक असतात आणि प्रत्येकाचे हे वेगळेपणच त्या व्यक्तीला ओळख देते. तुम्ही स्वतःची ओळख पुसू नका, विसरू नका. स्वतःवर भरभरून प्रेम करणारी माणसं खूप आनंदी असतात. अशा लोकांच्या सहवासात तुम्हाला खूप टवटवीत झाल्यासारखे वाटेल. खूप काही शिकायलाही मिळेल.

म्हणूनच या जन्मावर आणि या जगण्यावर शतदा प्रेम करताना या देहावर...म्हणजेच स्वतःवर सुध्दा प्रेम करायला शिका आणि प्रेमाची शक्ती अजमावून पहा!

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**
संचालक (मानव संसाधन)

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.